शैक्षणिक संदर्भ अंक १२२ फेब्रुवारी - मार्च २०२०

# मुलांच्या गोष्टी

संकलन: कृतिका बुरघाटे

# मुलांच्या गोष्टी

## संकलन: कृतिका बुरघाटे

*कृतिका बुरघाटे या प्रयोगशील लेखिकेने मुलांमध्ये लेखन अभिव्यक्ती विकसित करण्यासाठी कसा प्रयत्न केला याबद्दल आपण आमच्या अंक ११९ मध्ये वाचलेच आहे. (https://www.sandarbhsociety.org/issue-119/) या उपक्रमातून शाळेतील मुले लिहिती झाली. त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या कथा 'अर्णव' या पुस्तिकेत प्रकाशित केल्या आहेत. त्यातील काही निवडक कथा मागील अंकात दिल्या होत्या, काही इथे देत आहोत.*

# मदन्याचा अभ्यास

**लेखक: साहिल उताने,** वर्ग ६ वा

मदन्या अभ्यासात लय हुशार आहे असं मले नेहमी वाटे.

त्याचा अभ्यास अख्या गावात फेमस होता. तो अभ्यासले बसला तं आजूबाजूच्या समद्या घराईचा अभ्यास हा हा म्हणता पुरा होई. सगळ्याले वाटे मदन्या लय हुशार आहे. मदन्यापायी लय लोक इतिहास भूगोल शिकले. चौथ्या वर्गातील शिवाजी महाराज तर आता समदे लोकायले पाठ हाये.

निकाल लागल्यावर कोणिबी मदन्याले पास नापास ईचारात नोयते. समद्याले ठाव होत ह्या पास होतेच म्हणून.

आता तुम्हा समद्याले प्रश्न पडला असलं, कसा करत असल मद्न्या अभ्यास म्हणून.

त्याचं असं हाय, मदन्याले मनातल्या मनात वाचले कवा बी जमलं नाय. तो



वाचले बसला तर जोरजोरात वाचून काढी. एक प्रश्न दहा येळा तरी म्हणे. अन उत्तर बी दहा येळ वाचे.

"शिवाजी महाराजांचे गुरू कोण होते?"(दहा येळ) "शिवाजी महाराजांचे गुरू दादाजी कोंडदेव होते."(दहा येळ)

आता कसा नाय अभ्यास होणार चार घराईचा? आहुबाजूचे पोर तर त्याचं ऐकू ऐकू शिकले. आई बाबाले वाटे लय अभ्यासू हाय आमचा मदन्या.

पण हे अस्सल बात नाय, बात तर पुढं हाय.

मद्न्या कितिबी येळ कावून का ना वाचे त्याले काय बी लक्षात नाय राहायचं. पेपरात त्याले काय बी नाय लिवता यायचं. तो समदे वर्ग गुरुजींच्या किरपेन पास झाला. हे बात कोणाले बी पत्ता नाय लागली.

जवा मद्न्या १० वी ची परीक्षा देला तवा त्याचा निकाल अख्खा गाव पाहाले जमा झालता. समद्या पेपरात भोपळा पाहून समद्यायचे डोळे फिरले. "बाप्पा गा हे तर इपरिताच घडलं म्हणाचं, आमले वाटलं मेरिट येत पोरगं अन टीव्ही, पेपरात फोटो येते आमचा समद्याचा."

कायतरी घोळ हाय, ह्या निकाल चूक हाय, गुरुजीकड जाऊन ईचारलं पायजे म्हणून दोघंतिघं शाळंत गेले. तवा गुरुजीनं सांगलं समदं.

मद्न्या वाचाले लय पटाईत हाय, शंका नाय, पण मदण्याचा लय मोठा प्रॉब्लम हाय, त्याले पेपरात काय बी लिवता नाय येत, वाचलेलं काय बी समजत नाय, त्याले प्रश्न बी समजेना, त्यो दहा येळ वाचतो पण आपण का वाचत हाओ हे त्याले समजतच नाय. त्याले लक्ष देऊन वाचता येत नाही .त्याच्या काय बी लक्षत राहत नाही बघा.

हे आयकून समदे गार पडले. मद्न्याले कॅन्सरपेक्षा लय मोठी मेंदूची बिमारी हाय असं वाटून समदे लोक मदन्याची कीव करू लागले. आई बाबाचं तर काई विचारू नका, ते तर समदी आशा सोडून बसले अन मद्न्या शाळा सोडून टपरीवर आता पेपर वाचतो जोरजोरात.ज्याले वाचता येत नाही त्याच्यासाठी वाचक हाय मद्न्या.

*सहाव्या इयत्तेतल्या साहिलने लिहिलेली ही कथा शिक्षण अक्षमता असलेल्या मुलांबद्दल शिक्षण व्यवस्थेत असलेली असंवेदनशीलता दाखवून आपल्या डोळ्यात झणझणीत अंजन घालते. आपल्या व्यवस्थेमध्ये अशी मुले पुढे पुढे ढकलता येतात, त्यांच्याकडे दुर्लक्ष केले तरी चालते, आणि त्यांना आवश्यक ती मदत मिळतच नाही!*

*भाषा शिकताना ऐकणं, बोलणं, वाचणं, लिहिणं... हे टप्पे सहज समजले जातात. त्यातले पहिले दोन मूल घरात शिकतं, आणि दुसरे दोन शाळेत शिकेल अशी सामान्य अपेक्षा असते. मुळात भाषा शिकायची ती दुसऱ्याच्या मनातले विचार, भावना समजावून घ्यायला. जी माणसं प्रत्यक्ष भेटणार नाहीत, त्यांच्याकडूनही काही जाणून घ्यायचे ते वाचनाच्या मार्गाने. पण शाळेच्या धबडग्यात अन परीक्षांच्या चक्रात याचा आपल्याला विसर पडल्याचं दिसतं.*

*वाचणं म्हणजे केवळ लिहिलेल्या शब्दाचा उच्चार करता येणं नव्हे, ते समजून घेणंदेखील आहे. तसंच लिहिणं म्हणजे आपल्याला जे वाटतं, समजतं, मांडावंसं वाटतं तेच लिपीबद्ध करणं आहे, याची आठवण ठेवायला हवी. शाळेतल्या मुलांनी लिहिलेले निबंध ज्यांना तपासायला लागतात, त्यांना बरेचदा केवळ शब्द लिहिता येतात, म्हणून लिहिलेली पाने वाचायला मिळतात.*

*ही परिस्थिती बदलण्यासाठी काय करता येईल? काय प्रयोग चालू आहेत? आपल्या प्रतिक्रियांच्या अपेक्षेत आहोत. - संपादक मंडळ*

$$$$

# ऑनलाइन शॉपिंग

**लेखक: रोशन बोबडे,** वर्ग ७ वा

सूरज मालेकरच्या बापाने त्याले इंटरनेटवाला मोबाईल घेऊन देला. आमच्या गावात ७ वी तल्या पोराले असा मोबाईल घेऊन देणारा पहिलाच बाप होय. मालेकराकड लय पैसे हायेत, त्याले मिजास बी बहुत हाय.



सूरजनं त्या मोबाईलवर ऑनलाइन शॉपिंग केली. त्यानं लॅपटॉप बोलावलं म्हणे. सगळ्याले सांगत सुटला. आमच्या वर्गात सगळे त्याचा लॅपटॉप कवा येते का म्हणून वाट पाहत होते. जेव्हा त्याच्या घरी सामान आलं पोस्टनं तेव्हा त्याचे डोळे फाटले, "हे का हो गा आलं? मी तर दुसरंच बोलावलं होतं."

त्याले खेळण्यातला साडे चार हजाराचा काहीतरी सामान आला होता. आता कसं?

त्याले काही बी चिंता नाही वाटली, वापस करून देतो. पैसे वापस भेटते म्हणून तो बापाले समजावत होता. त्याचा बाप होता म्हणून समजला, आमचा गिन तर असता न जीवच घेतला असता.

आमी नाय करो बा असा खेळ पैशाचा.

$$$$

# आठवडी बाजार

**लेखक-सोनाली वाघमारे,** वर्ग ६ वा

मले शनिवार बाजारले जायले लगीत आवडते. तेथ सगला बाजार फिराले मस्त मजा येते.

खास मजा तर त्या जिलेबी, भजे अन शेव विकणाऱ्याच्या हाटेलासमोर असते. मस्त तळण्याचा वास येस असते, बाया माणसं त्याच्यापाशी रांग लावून असतेत.



समोसे, कचोरी, वडे, पुरी पाहून मजा तोंडले मस्त पाणी सुटते.

आईजवळ, आजीजवळ, बाबाजवळ जिद करून पैसे मी पैसे जमा करतो, ते या हाटेलात बसून पाहिजे ते खाण्यासाठी.

आई मले बाजारात थैल्या धराले नेते. आईचं समदं सामाईन घेऊन झाल्यावर मी हाटेलात जाची जिद करतो. मले माहीत असते आई म्हणणार पैसे सरले. मी मग माज्या

खिशातून पैसे काढून दाखवतो. आई मग मले हाटेलात नेते, पायजे ते खाऊ देते अन बहिणीसाठी, घरच्याइसाठी शेव, जिलेबी घेते. मले घरी गेल्यावर का खाल्लं ते सांगू नको म्हणते. बहीण जिद केली तर तिले समजवाले लगीत तरास होते.

एका बाजाराच्या दिवशी मी सोता काही खाललो नाही पण बईनीसाठी २ समोसे आनलो. तवा आईनं मजा लाड केला होता.

$$$$

# एमू

**लेखक: पायल जमदाडे,** वर्ग ६ वा

आमच्या गावातील एका माणसाने शहामृग आणले.

शेतात मोठ खोपट करुन कोंबडी पालन केल्यासारख काम त्यानं सुरू केलं. सारं गाव शहामृग पाहाले शेतात धावलं. सगळ्या गावात शहामृगाची चर्चा झाली.



पुस्तकात पायलेला शहामृग आमच्या गावात आला म्हणून आमी लई खुशीत होतो. आमी समदे पोर पोरी शेतात जाऊन शहामृग पाहून आलो, त्याचे पिल्ले, अंडे लाजवाब होत ते, लोक त्याले कोंबडी म्हणून खावाले येत होते, पार्ट्या करत होते, लई महाग आहे म्हणे ते, मोठे पैसे वाले लोक येत होते त्याले खावाले.

मले तर कसं कसं वाटे. इतल्या दुरून परदेशातून शहामृग आणलं तर ठेवाले नाही का पायजे पाहासाठी. पोर आली असती पहाचे पैसे घ्याची होते त्यानं. पण खाची आवड लोकायले भारी अन पैसे कमवाची बी.

आमी टीचरले सांगलो तर ते विश्वासच करे नाही. शहामृग इथं येऊच शकत नाही म्हणे. मग आमी ६ वा, ७ वा वर्ग शेतात परिसर भेट म्हणून न्यायला लावलो, टीचर तरी बी नाहीच म्हणे.

जेवा आमी तो शहामृग अन त्याचे पिले अंडे दाखवले तवा टीचर पागलावानी हासली. आम्ही समदे परेशान झालो. मग टीचरन मोबाईल काढला अन आमा समद्याले त्यात शहामृग दाखवला अन मग एमू दाखवला.

"हा एमू पक्षी आहे. ह्याचा व्यवसाय करतात. कुकुटपालन सारखा. हे महाग आणि चवदार असते." असं काही काही सांगायले लागली, तवा खोपडीतून भाऊ बाहेर आला, कल्ला काहले करता, शहामृग चिडंल न म्हणून वरडला.

टीचर त्याच्यावर वरडली. शहामृग होय का हा म्हणून विचारली. तवा तो म्हणाला, "नाही जी हे इमू हाय."

मग गावात आणि पोरांना खोट्या हा एमू आहे हे सांगायला काय झालं होतं, शहामृग सांगून का फसवितो सगळ्यांना, म्हणून टीचरनं त्याला चांगला झापला. तवापासून आमी त्याले शहामृगवाला भाऊ म्हणतो.

$$$$